पान १ वरून

## चाळीतील खोलीचे भाडे ३५ हजार ७२५ रूपये!

निवासस्थान रिक्त करणे आवश्यक होते. मात्र, त्यांनी ४२ महिने निवासस्थान रिक्त केले नाही. त्यामुळे त्यांना प्रति महिना ३५ हजार ७२५ रूपये प्रमाणे १८ लाख ३९ हजार ४८० रूपये दंड आकारण्यात आले. एवढेच नाही तर त्यांना मिळणाऱ्या तुटपुंज्या निवृत्तीवेतनामधून दरमहा दहा हजार रूपये कपात सुरू केली आहे. ही कपात २०३६ पर्यंत अर्थात १५८ हप्त्यांमधून वसूल करण्यात येणार असल्याचे पत्र रणपिसे यांना देण्यात आले आहे. त्यामुळे त्यांच्या पायाखालची वाळूच घसरली आहे. कारण सेवानिवृत्तीनंतर काम करणे अशक्य असून घरी पत्नी आजारी आहे. एक घटस्पोटीत मुलगी त्यांचा सांभाळ कसा करणार अशी काळजी त्यांना लागली आहे. शंभर वर्षांपूर्वीच्या वसाहतीची दुरवस्थायेरवडा मनोरूग्णालय कर्मचारी वसाहत ही शंभर वर्षांपूर्वीची आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग (पीडब्ल्यूडी) वसाहतीची वेळोवेळी देखभाल व दुरूस्ती करीत असतो. मात्र अतिशय जीर्ण झालेल्या वसाहतीची मोठी दुरवस्था झाली आहे. घराचे छप्पर गळके, शौचालयाची दुरवस्था परिसरात अस्वच्छतेचे साम्राज्य त्यामुळे चाळीतील अनेक घरे रिकामी आहेत. मात्र, एखादा कर्मचाऱ्याने परिस्थितीमुळे घर सोडले नाही तर त्यांच्यावर मोठ्या दंडाची रकम आकारली जाते. हा दंड अन्यायकारक असल्याचे मत मनोरूग्णालय कर्मचारी संघटनेने व्यक्त केले आहे.

### शंभर वर्षांपूर्वीच्या लाकूड, लोखंड आणि घडीव दगडातून लाखो रूपये

भंगार माल पाहून येथील कर्मचाऱ्यांचे डोळे पांढरे व्हायची वेळी आली. कारण जुने सागवान लाकूड, लोखंड आणि घडीव दगडाला आजही चांगली किंमती मिळते. सुरवातील येरवडा मनोरुग्णालयाचे अधिक्षक यांनी संबंधित ठेकेदाराला भंगारमाल घेऊन जाऊन दिले नाही. मात्र, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता डॉ. सु.र. काटकर यांनी संबंधित ठेकेदाराला जुन्या इमारतीच्या पाडकामाच्या बदल्यात जुने सागवाड लाकूड, लोखंड आणि घडीव दगड देणार असल्याचा निविदे मध्ये नमूद आहे. त्यामुळे ठेकेदाराला ते घेऊन जाऊ द्या, असे लेखी पत्र डॉ. काटकर यांनी दिले. त्यानंतर ठेकेदाराने काही ट्रक सागवाड लाकूड, लोखंड आणि घडीव दगड घेऊन गेले.

# महापालिकेच्या वतीने आदर्श शिक्षकांचा गौरव



**पिंपरी । प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने शिक्षक दिनाचे औचित्य साधून २३ शिक्षकांना आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. आमदार अमित गोरखे, अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, तृप्ती सांडभोर यांच्या प्रमुख उपस्थितीत चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात हा कार्यक्रम पार पडला.

याप्रसंगी महापालिकेचे सहाय्यक आयुक्त किरणकुमार मोरे, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, प्रशासन अधिकारी संगीता बांगर, सहाय्यक प्रशासन अधिकारी रजिया खान यांच्यासह विविध शाळांचे मुख्याध्यापक, पर्यवेक्षक व शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी आमदार अमित गोरखे म्हणाले, शिक्षक हा समाजातील महत्त्वाचा पैलू आहे. महापालिकेचा शिक्षण विभाग आणि शाळा अतिशय उत्तम कार्य करीत आहेत. मी देखील महापालिकेच्या शाळेचा विद्यार्थी असून माझ्या जडणघडणीत शिक्षकांचा मोठा वाटा आहे, असेही ते म्हणाले. अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील म्हणाले, शाळा म्हणजे मुलांच्या भविष्यासाठीचा भक्कम पाया आहे. त्या पायाला मजबूत करण्याचं कार्य आपले शिक्षक निष्ठा, समर्पण आणि प्रेमाने करीत आहेत.

पर्यवेक्षक आणि शिक्षक यांचा एकत्रित प्रयत्न हीच आपल्या महापालिका शाळांची खरी ताकद आहे. शिक्षकांच्या या योगदानामुळे महापालिका अधिक गुणवत्तापूर्ण, सक्षम आणि आदर्शवत शाळा उभारण्याच्या दिशेने सातत्याने प्रगती करत आहे.

सहाय्यक आयुक्त किरणकुमार मोरे यांनी सांगितले की, महापालिकेच्या शाळांमध्ये शिक्षक विद्यार्थ्यांना केवळ शिक्षण देत नाहीत, तर त्यांचे व्यक्तिमत्त्व घडविण्याचे महत्त्वाचे कार्यही करतात. शिक्षकांच्या प्रयत्नांमुळे आपल्या महापालिकेच्या शाळांचा शैक्षणिक दर्जा उंचावत आहे. शिक्षण विभाग सातत्याने गुणवत्ता सुधारण्यासाठी प्रयत्नशील असून, या प्रवासात शिक्षकांचा सहभाग आणि त्यांचे योगदान अत्यंत मोलाचे आहे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रशासन अधिकारी संगीता बांगर यांनी केले. सूत्रसंचालन चारोशीला फुगे यांनी केले, तर आभार गणेश लिंगडे यांनी मानले.

**आयुक्तांनी व्हिडिओ संदेशाद्वारे दिल्या शुभेच्छा**

पिंपरी चिंचवड महापालिकेचे आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांचा यावेळी शिक्षक दिनानिमित्त शुभेच्छा देणारा व्हिडिओ संदेश दाखवण्यात आला. यामध्ये आयुक्त सिंह यांनी शुभेच्छा देताना म्हटले आहे की, शिक्षक म्हणजे फक्त ज्ञान देणारे नाहीत, तर मुलांच्या स्वप्नांना आकार देणारे खरे शिल्पकार आहेत. प्रत्येक मुलाच्या यशामागे त्याच्या शिक्षकाची निष्ठा, कष्ट आणि ममत्व दडलेलं असतं. पिंपरी चिंचवड महापालिकेच्या शाळांनी गेल्या काही वर्षांत केलेली प्रगती ही शिक्षक आणि पालक यांच्या मेहनतीमुळेच शक्य झाली आहे. शाळा म्हणजे केवळ शिक्षणाचं केंद्र नव्हे, तर भावी पिढी घडविण्याचं मंदिर आहे. आपल्या शाळा पालकांना अभिमानाने निवडाव्याशा वाटाव्यात हा आपला ध्यास असून, त्या दिशेने शिक्षकांचा वाटा सर्वांत मोठा आहे.'

**आदर्श शिक्षक पुरस्काराने गौरविण्यात आलेले शिक्षक**

शिक्षक दिनानिमित्त विशेष कामगिरीबद्दल महापालिकेच्या वतीने आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आलेल्या शिक्षकांमध्ये बालवाडी, प्राथमिक आणि माध्यमिक शाळांतील शिक्षकांचा समावेश होता. यामध्ये क्रीडा शिक्षक भाऊसाहेब व्यंकट खैरे, पीसीएमसी पब्लिक स्कूल जाधववाडी कन्या प्राथमिकचे जितेंद्र कराड आणि आबासाहेब पाळवंदे यांना विशेष पुरस्कार देण्यात आला. तर, थेरगाव येथील बालवाडी विभागातील यशवंतराव चव्हाण प्राथमिक शाळेच्या सविता मांडेकर, यशवंतराव चव्हाण उर्दू शाळा थेरगावच्या नसरीन बानो मोहम्मद सुलतान आणि सावित्रीबाई फुले शाळा मोशीच्या वैशाली साकोरे यांना आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाला. प्राथमिक शाळांमधून मोशी मुले येथील पीसीएमसी पब्लिक स्कूलच्या प्रियंका गावडे, सुभांगी भोंडवे, दिघी कन्या पब्लिक स्कूलचे प्रदीप घुटे, भोसरी कन्या पब्लिक स्कूलच्या स्वाती शिंदे, मोशी कन्या पब्लिक स्कूलच्या कांचन घोडे, चिखली कन्या पब्लिक स्कूलच्या विश्वलता मोरे, कुदळवाडी पब्लिक स्कूलचे मारुती खामकर, पिंपळे गुरव पब्लिक स्कूलच्या चित्रा शेवकरी आणि थेरगाव उर्दू पब्लिक स्कूलच्या उस्ताद बिबिहाज्रा जंगबहादूर यांना आदर्श शिक्षक पुरस्काराने गौरविण्यात आले.

# रेल्वे प्रवाशांचे मोबाइल चोरणारे गजाआड; २० मोबाइल संच जप्त

**पुणे । प्रतिनिधी**

रेल्वे प्रवाशांचे मोबाइल संच चोरणाऱ्या चोरट्यांना लोहमार्ग पोलिसांनी अटक केली. चोरट्यांकडून २० मोबाइल संच जप्त करण्यात आले. बुद्धराज मोरपाल बागडी (वय ३२), अमरलाल हंसराज बागडी (वय २२, दोघे मूळ रा. बारा, राजस्थान, सध्या रा. मंगळवार पेठ) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. बुद्धराज आणि अमरलाल हे फिरस्ते आहेत. मंगळवार पेठेतील पदपथावर ते राहायला आहेत.

पुणे रेल्वे स्थानकात प्रवासी तरुण रेल्वे डब्यात प्रवेश करत होता. त्या वेळी आरोपी बागडी यांनी तरुणाकडील मोबाइल संच लांबविला होता. याबाबत प्रवासी तरुणाच्या मित्राने लोहमार्ग पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती. पोलिसांकडून मोबाइल चोरट्याचा शोध घेण्यात येत होता.

बागडी यांनी रेल्वे स्थानक परिसरात प्रवाशांकडील मोबाइल संच हिसकावून नेल्याची माहिती लोहमार्ग पोलिसांच्या तपास पथकाला मिळाली. पोलिसांनी त्याला पकडण्यासाठी सापळा




लावला. पोलिसांना पाहताच दोघे जण पळाले. पाठलाग करून दोघांना पकडण्यात आले. आरोपी पदपथावर तात्पुरते छत बांधून राहत होते. पोलिसांनी तपासणी केली. बागडी यांच्याकडून २० मोबाइल संच जप्त करण्यात आले. जप्त करण्यात आलेल्या मोबाइल संचाची किंमत एक लाख ९० हजार रुपये आहे.

लोहमार्ग पोलीस अधीक्षक अश्विनी सानप, अतिरिक्त अधीक्षक रोहिदास पवार, उपविभागीय अधिकारी जयराम पायगुडे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रमोद खोपीकर, उपनिरीक्षक यशवंत साळुंके, सुनील कदम, अनिल दांगट, नीलेश बिडकर, सिद्धार्थ वाघमारे, नेमाजी केंद्रे, छाया चव्हाण, मारटकर, तसेच रेल्वे सुरक्षा दलाचे निरीक्षक यादव, उपनिरीक्षक लाड, युवराज गायकवाड, विशाल माने, रसुल सय्यद यांनी ही कामगिरी केली.

# येरवडा कारागृहात आता तब्बल ९०० कॅमेऱ्यांची नजर

**पुणे । प्रतिनिधी**

येरवडा कारागृहात वर्षातून सुरक्षा पडताळणी (सिक्युरिटी ऑडिट) होत असते. ही पडताळणी विशेष शाखेचे पोलीस उपा आयुक्त, परिमंडळ चारचे उपायुक्त, येरवडा सहायक पोलीस आयुक्त यांच्या मार्गदर्शनाखाली येरवडा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक व पोलीस कर्मचारी करतात.

गेल्या तीन वर्षां ही सुरक्षा पडताळणी झालेली नव्हती. मात्र, ९ मार्च २०२३ रोजी येरवडा मध्यवर्ती कारागृहाची सुरक्षा पडताळणी झाली . यामध्ये वरिष्ठ अधिका-यांनी संपूर्ण कारागृहात कॅमेरे लावण्याची सुचना केली होती. त्याप्रमाणे कारागृह प्रशासनाने प्रस्ताव तयार केला होता. त्याप्रमाणे कारागृहात ९०० पेक्षा अधिक कॅमेरे बसविण्यात येणार आहेत. त्यामुळे कारागृहातील टोळी युद्ध व बेकायदा कृत्यावर लगाम बसणार आहे.

यामुळे कारागृहात टोळी युद्धाच्या घटना घडत आहेत. कारागृहाचे कारागृहातील कैदी संख्येचा विचार करता अनेक वेळा कारागृहात हाणामारीच्या घटना घडतात. तरी कधी मोबाईल सापडतात तर कधी अंमली पदार्थ सापडण्याच्या घटना घडतच असतात. येरवडा मध्यवर्ती कारागृहाची क्षमता २,३२३ कैद्यांची आहे. मात्र, सध्या ही संख्या ६,५०० झाली आहे. गेल्या दीड ते दोन वर्षांत शहरातील मोक्का कारवाई अंतर्गत तब्बल सातशे गुन्हेगारी टोळीतील कैदी कारागृहात आहेत. त्यामुळे जुने व नवीन कैदी यांच्यामध्ये नेहमी मारामारी होत असते. दरम्यान, दर सहा महिन्याला कारागृहाची सुरक्षा पडताळणी होत असते.

पुणे शहर पोलीस आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली ही सुरक्षा पडताळणी होते. मात्र, गेली तीन वर्षांपासून अशी सुरक्षा पडताळणी झालीच नाही नव्हती. नियमित अशी पडताळणी झाली असती तर संपूर्ण कारागृहातील झाडाझडती झाली असती. यामध्ये कैद्यांकडे अमली पदार्थ, मोबाईल आहेत का, याची तपासणी झाली असते.

कारागृहाच्या परिसरात दगड, झाडाच्या फांद्या आहेत का, याची पाहणी होते. यासह आपत्कालीन स्थितीत अग्निशमन वाहन, रुग्णवाहिका कारागृहातील बराकीपर्यंत पोहचते का, याची माहिती घेतली जाते. सुरक्षा पडताळणीच न झाल्यामुळे कारागृहात सहज दगड उपलब्ध होतात. त्यामुळे हाणामारीच्या घटना घडत होत्या. यामध्ये मध्यस्थी किंवा भांडण सोडविण्यासाठी गेलेल्या रक्षकाला गंभीर मारहाण होते, ही बाब अतिशय गंभीर आल्याचे समोर आले.



**मोक्काच्या गुन्ह्यातील गुंडाची कारागृहात दहशत**

**शहरात गेल्या दोन वर्षांत पोलीसांना मोक्का कारवाई करुन सातशेपेक्षा जास्त गुंडांची कारागृहात रवानगी केली आहे. त्यामुळे शहर शांत झाले असले तरी या गुंडांनी कारागृहात धुडगुस घातला आहे. त्यामुळे कारागृहात नवीन व जुने असे गट पडून टोळी युद्धांचे प्रसंग घडत आहेत. याला वेळीच आवर बसणार आहे.**

# गणेश विसर्जनासाठी १७ प्रमुख रस्ते बंद; पर्यायी मार्ग व पार्किंगची विशेष व्यवस्था

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे शहरात ६ सप्टेंबर रोजी होणाऱ्या गणेश विसर्जन मिरवणुकीच्या पार्श्वभूमीवर वाहतुकीचे मोठे नियोजन करण्यात आले आहे. लाखो भाविकांच्या गर्दीमुळे शहरातील मध्यवर्ती रस्त्यांवर प्रचंड ताण येण्याची शक्यता असल्याने पोलिसांनी खबरदारीचा उपाय म्हणून १७ प्रमुख रस्ते बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. यामध्ये लक्ष्मी रस्ता, टिळक रस्ता, बाजीराव रस्ता, नेहरुरोड, अप्पा बळवंत चौक व बेलबाग चौक परिसरातील मार्गांचा समावेश आहे. सकाळपासून रात्री उशिरापर्यंत या रस्त्यांवरून कोणत्याही प्रकारची वाहनवाहतूक होणार नाही.

वाहतूक कोंडी टाळण्यासाठी पर्यायी मार्गांचीही व्यवस्था करण्यात आली आहे. डेक्कन, शनिवार पेठ, मंडई आणि स्वारगेट परिसराकडे जाणाऱ्या वाहनांना वळवून देण्यात येणार असून, कात्रज, कोथरुड, औंध, येरवडा आणि हडपसरकडून येणाऱ्या वाहनांना मिरवणुकीच्या मार्गापासून दूर ठेवण्यासाठी बाहेरील रिंगरोड आणि बायपास मार्गांचा वापर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

याशिवाय, नागरिकांना खासगी वाहनांऐवजी सार्वजनिक वाहतुकीचा वापर करण्यास प्रोत्साहन देण्यात आले आहे. पुणे महापालिका व वाहतूक विभागाने वेगवेगळ्या ठिकाणी पार्किंगची विशेष सोय उपलब्ध करून दिली आहे. झचझचड बससेवाही वाढवण्यात येणार असून, नागरिकांनी अधिकृतपणे सांगितलेल्या ठिकाणीच गाड्या उभ्या करण्याचे निर्देश दिले आहेत.

पोलिसांनी सर्व पुणेकरांना संयम व शिस्त पाळण्याचे आवाहन केले आहे. विसर्जन मिरवणुकीदरम्यान वाहनांची पार्किंग अनधिकृत ठिकाणी न करता ठरवलेल्या ठिकाणीच करावी, अधिकृत वाहतूक मार्गदर्शनाचे पालन करावे, तसेच गर्दीच्या ठिकाणी अल्पवयीन मुलं आणि ज्येष्ठ नागरिकांची विशेष काळजी घ्यावी, असे सांगण्यात आले आहे. यंदा विसर्जन मिरवणुकीत प्रचंड गर्दी होण्याची शक्यता असल्याने वाहतूक आणि सुरक्षेसाठी अतिरिक्त पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. पुणे पोलिसांनी ११ ठिकाणी मदत केंद्र, ८,००० पेक्षा जास्त पोलीस कर्मचारी, ड्रोन, उउढत व मोबाइल सर्व्हिलन्स युनिट्सची व्यवस्था तैनात केली आहे.

# पुणे–नाशिक महामार्गावर नव्या कारचा ताबा सुटून अपघात

**पुणे । प्रतिनिधी**

शनिवारी संध्याकाळी पुणे–नाशिक महामार्गावर मोठी घबराट पसरली, कारण नुकतीच विकत घेतलेली एक कार अचानक बिघडलेल्या ताब्यामुळे महामार्गावर इतर लेनमध्ये घुसली. सुदैवाने या घटनेत कोणीही जखमी झाले नाही तसेच इतर वाहनांचेही नुकसान झाले नाही.

ही घटना सायंकाळी साडेसहाच्या सुमारास घडली असून, महामार्गावरील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांमध्ये संपूर्ण प्रकार कैद झाला. त्यानंतर या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर काही वेळातच व्हायरल झाला. मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, भोसरीतील आदिनाथ नगर येथील एका शोरूममधून ही कार नुकतीच खरेदी करून पिंपरी–चिंचवडमधील रहिवाशाला देण्यात आली होती. खरेदीची औपचारिकता पूर्ण झाल्यानंतर गाडी चालवताना चालकाने चुकून ब्रेकऐवजी क्लच दाबल्यामुळे कार अचानक वेगाने पुढे सरकली. या गोंधळात गाडी महामार्गावरील डिव्हायडरवर जाऊन आदळली आणि शेवटी समोरच्या रस्त्याच्या बाजूला धडकून थांबली. नुकत्याच विकत घेतलेल्या गाडीमुळे झालेला हा प्रकार पाहून उपस्थित नागरिकांमध्ये क्षणभर भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र सुदैवाने कोणतीही जीवितहानी टळल्याने सर्वांनी सुटकेचा निश्वास सोडला.

# शिक्षण विभागातर्फे शिक्षक दिनानिमित्त 'शिका आणि घडवा' ताब्यात उपक्रमाचे आयोजन...

**पुणे । प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांच्या हातात शिकवण्यासाठी पुस्तकं, समोर ज्ञानग्रहण करण्यासाठी बसलेले अधिकारी... मुलांनी कल्पकतेने रंगवलेली चित्रं आणि त्यांच्या आवाजात घुमणारे धडे... विद्यार्थ्यांनी विचारलेले प्रश्न व त्याला उत्तरे देणारे अधिकारी... असे उत्साहपूर्ण, आनंददायी आणि अनुभवांनी भरलेले वातावरण शिक्षक दिनानिमित्त आयोजित 'शिका आणि घडवा' या अभिनव उपक्रमात अनुभवायला मिळाले. पिंपरी चिंचवड महापालिकेच्या शिक्षण विभागाने आयोजित केलेला हा उपक्रम शिक्षक दिनाला खऱ्या अर्थाने संस्मरणीय ठरला.

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या शिक्षण विभागामार्फत शिक्षक दिनानिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या अंतर्गत महापालिका शाळेतील विद्यार्थ्यांना महानगरपालिकेत चालणाऱ्या कामकाजाची माहिती व्हावी या उद्देशाने 'शिका आणि घडवा' या अभिनव उपक्रमाचे आयोजन नुकतेच करण्यात आले होते. या अनोख्या उपक्रमात महापालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांनी शिक्षकांची भूमिका साकारली तर महापालिकेचे आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह, अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांच्यासह सहायक सह शहर अभियंता बापू गायकवाड, मुख्य उद्यान अधिक्षक महेश गारगोटे, उप आयुक्त सीताराम बहुरे, शिक्षण विभागाचे सहाय्यक आयुक्त किरणकुमार मोरे, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, शिक्षण विभाग प्रशासन अधिकारी संगीता



बांगर, उप अग्निशमन अधिकारी बाळासाहेब वैद्य, विनय नाळे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह महापालिका अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले होते.

'शिका आणि घडवा' या कार्यक्रमाची सुरुवात उत्साहपूर्ण वातावरणात झाली. विद्यार्थ्यांनी वज्ञान, गणित, मराठी, हिंदी आणि चित्रकला या विषयांचे वर्ग घेतले. प्रत्येक वर्गात विद्यार्थ्यांनी शक्षकांसारखीच तयारी करून अधिकाऱ्यांना पाठ्यपुस्तकातील धडे शिकवले. विज्ञान विषयात विद्यार्थ्यांनी 'घर्षण बल' या धड्याचे प्रात्यक्षिक दाखवले. या प्रात्यक्षिकात आयुक्त शेखर सिंह यांनाही सहभागी करून घेण्यात आले.

हिंदी विषयाच्या तासात विद्यार्थ्यांनी 'वारिस कौन' ही नाटिका महापालिकेच्या विविध विभागांच्या अधिकाऱ्यांकडून वाचन करून घेतली. त्यानंतर अधिकारी वर्गाला त्या नाटिकेतून नवीन शब्द शोधणे, प्रश्नोत्तर लिहिणे अशी कामे देण्यात आली होती. त्यानंतर वातावरण हलकेफुलके करण्यासाठी पहिलीतील विद्यार्थ्यांनी 'एक होता कावळा' हे बालगीत सादर केले.

चित्रकला विषयाच्या वर्गात विद्यार्थ्यांनी संकल्पना चित्रकला, रंगसंगती आणि चित्र रंगवणे या बाबी अधिकाऱ्यांना शिकवल्या. प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या कल्पकतेने विविध चित्रांची मांडणी करून दाखवली. यामुळे अधिकाऱ्यांना लहानपणीचे चित्रकला तास पुन्हा अनुभवता आले. मराठी विषयात विद्यार्थ्यांनी 'जल दिंडी' हा धडा शिकवला. या धड्यातून नद्यांमध्ये होणारे प्रदूषण आणि त्यावर उपाय याबाबत माहिती देण्यात आली. त्याचबरोबर विद्यार्थ्यांनी पवना नदी सुधार प्रकल्पाची माहिती अधिकाऱ्यांना दिली. पर्यावरण संवर्धनाबाबत विद्यार्थ्यांच्या जागरूकतेचा प्रत्यय यावेळी आला. 'शिका आणि घडवा' या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना शिक्षकाची भूमिका साकारण्याची संधी मिळाली. शिकवताना स्वतःचे ज्ञान पक्के करण्याचा अनुभव त्यांनी घेतला. दुसरीकडे अधिकारी वर्गाला पुन्हा एकदा शालेय जीवन अनुभवता आले. शिक्षक दिनानिमित्त आयोजित हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी आणि अधिकारी वर्गासाठीही संस्मरणीय ठरला. विद्यार्थ्यांनी केलेल्या प्रयत्नांचे मनापासून कौतुक करताना आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह आणि अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी विद्यार्थ्यांचा गुलाबपुष्प व पुस्तक देऊन सत्कार केला.

> **विद्यार्थ्यांनी शिकवलेल्या या धड्यांमुळे पुन्हा एकदा शाळेच्या आठवणी जाग्या झाल्या. अधिकाऱ्यांसाठी हे क्षण वेगळे आणि आनंददायी होते. मुलांच्या जिज्ञासू वृत्तीमुळे ज्ञान किती सोप्या पद्धतीने आत्मसात करता येते, हे अनुभवायला मिळालं. 'शिका आणि घडवा'सारखे उपक्रम केवळ विद्यार्थ्यांनाच नाही तर समाजालाही सकारात्मक दिशा दाखवतात.**
> **– शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी चिंचवड महापालिका**

> **विद्यार्थ्यांनी घेतलेले वर्ग म्हणजे केवळ शालेय धडे नव्हते, तर जीवनमूल्य शिकवणारे अनुभव होते. त्यांच्या सर्जनशीलतेतून, आत्मविश्वासातून आणि पर्यावरण संवर्धनाबाबतच्या जाणिवेतून पुढील पिढी किती सजग आहे, हे दिसून आले. शिक्षक दिनाच्या या अनोख्या पद्धतीने विद्यार्थ्यांचे सर्वांगीण व्यक्तिमत्त्व घडवण्याचा पाया अधिक भक्कम होतो.**
> **– प्रदीप जांभळे पाटील, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका**

> **या उपक्रमात विद्यार्थ्यांनी शिक्षकाची भूमिका इतक्या सहजतेने साकारली की प्रत्येक तास ज्ञानाचा नवा प्रवास ठरला. मुलांच्या कल्पकता, प्रयोगशीलता आणि विचारशक्तीने प्रभावित झालो. अशा उपक्रमांमुळे मुलांचा आत्मविश्वास वाढतो आणि शिक्षण प्रक्रियेतील त्यांचा सहभाग अधिक सशक्त होतो.**
> **– किरणकुमार मोरे, सहायक आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका**

# सिंहगड रोड फ्लायओव्हरखालील सजावटीच्या लाईटिंगवर १.५ कोटी खर्चाचा प्रस्ताव

**पुणे । प्रतिनिधी**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सिंहगड रोड फ्लायओव्हरच्या तिसऱ्या टप्प्याचे उद्घाटन केल्यानंतर अवघ्या काही दिवसांत पुणे महापालिकेने या पुलाखाली सजावटीच्या प्रकाशयोजनेचा प्रस्ताव पुढे आणला आहे. तब्बल १.५ कोटी रुपयांची निविदा काढण्यात आल्यामुळे नागरिक आणि राजकीय नेत्यांकडून तीव्र टीका होत असून, सार्वजनिक पैशांचा अपव्यय केल्याचा आरोप प्रशासनावर होत आहे.

हा फ्लायओव्हर तीन टप्प्यांत उभारण्यात आला असून फनटाईम चौक ते राजाराम पूल हा महत्त्वाचा टप्पा आता पूर्ण झाला आहे. त्यामुळे वाहतूक कोंडी काही प्रमाणात कमी होण्याची अपेक्षा आहे. परंतु फ्लायओव्हर पूर्ण झाल्यानंतर अवघ्या काही काळातच सजावटीसाठी कोटी रुपये खर्च करण्याच्या निर्णयामुळे गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत.

महापालिकेने याआधीच या फ्लायओव्हरसाठी विजेच्या कामांसाठी ७५ लाखांची निविदा काढली होती, त्यानंतर आणखी २५ लाखांचा खर्च करण्यात आला. आता १.५ कोटींचा नवीन प्रस्ताव येत असल्याने केवळ प्रकाशयोजनेवरच दोन कोटींपेक्षा अधिक खर्च होणार आहे. शहरातील अनेक भागांत अजूनही रस्त्यांची बिकट अवस्था, जलनिकासीतील त्रुटी आणि पादचारी मार्गांचा अभाव कायम असताना एवढा प्रचंड निधी लाईटिंगवर खर्च का केला जातोय, असा प्रश्न नागरिक विचारत आहेत. स्थानिक रहिवाशांच्या मते, फ्लायओव्हरखालचा रस्ता खड्ड्यांनी भरलेला आहे. पावसाळ्यात पाणी साचणे, वाहतूक कोंडी आणि त्यामुळे होणारे हाल यामुळे प्रवाशांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागते. अशा वेळी सौंदर्यीकरणासाठी कोटी खर्च करण्याऐवजी रस्त्यांची दुरुस्ती करणे अधिक गरजेचे असल्याचे मत नागरिकांनी नोंदवले आहे. दरम्यान, महापालिका अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे की, फ्लायओव्हरखालील जागेला आकर्षक रूप देऊन परिसराला वेगळी ओळख मिळावी यासाठी ही योजना आहे. तसेच पर्यटन आणि शहराच्या सौंदर्यवृद्धीसाठी अशा प्रकल्पांची अंमलबजावणी केली जाते. मात्र हे उपाय तातडीने नागरिकांच्या अडचणी सोडविणारे नसल्याने नाराजी वाढत आहे.